परीक्षा व मूल्यमापन मंडळ
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
दूरध्वनी क्र.२०२५६२१३४६
Website : www.unipune.ac.in.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**Savitribai Phule Pune University**

(Formerly University of Pune)

**Board of Examinations & Evaluation**
**Ganeshkhind, Pune - 411007**
**Phone: 2025621398**
**E-mail:** bee@pun.unipune.ac.in

---

संदर्भ : परीक्षा/छा.व.ता./१९२२ दिनांक : १७ डिसेंबर, २०२५

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था
(पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा आणि दादरा—नगर हवेली)

**विषय :** शैक्षणिक वर्ष २०२४—२५मध्ये अभ्यासक्रमाची N+2 हा सत्रपूर्तता कालावधी संपुष्टात आलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२५—२६ या शैक्षणिक वर्षात हिवाळी सत्र २०२५ आणि उन्हाळी सत्र २०२६ अशा दोन परीक्षांत प्रविष्ट होण्याच्या विशेष संधीच्या अनुषंगाने पात्र विद्यार्थ्यांची माहिती काळजीपूर्वक खात्री करून पोर्टलवर कायम करण्याबाबत..

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४—२५ मध्ये N+2 अशी सत्रपूर्तता संपलेल्या पात्र विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२५—२६ या शैक्षणिक वर्षासाठी परीक्षेस बसण्यासाठी दोन संधी उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने पात्र विद्यार्थ्यांना विशेष बाब म्हणून संधी मिळण्यासाठी संबंधित महाविद्यालयांनी पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती मा. प्राचार्य/संचालक यांनी प्रचलित अनुषंगिक अध्यादेश, विविध केंद्रिय व राज्यस्तरीय प्राधिकरणाचे निकष, परीक्षाविषयक व अभ्यासक्रमविषयक मार्गदर्शक तत्त्वे व अटी या सर्वांबाबतची खातरजमा करून http://examinward.unipune.ac.in या लिंकवर उपलब्ध नमुन्यात कायम करणे आवश्यक आहे. सदर पात्र विद्यार्थ्यांना दोन परीक्षांची विशेष संधी फक्त हिवाळी सत्र २०२५ आणि उन्हाळी सत्र २०२६ या सत्राकरिता उपलब्ध करून दिलेली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५—२६ या शैक्षणिक वर्षासाठी (दोन संधी) परीक्षेस बसण्यासाठी संधी खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे देण्यात येत आहे.

| अ. क्र. | अभ्यासक्रमाचा कालावधी | अतिरिक्त दोन वर्षे | अतिरिक्त एक वर्ष | अभ्यासक्रमातील प्रथम वर्षातील प्रवेश खालील शैक्षणिक वर्षात असणे आवश्यक |
|---|---|---|---|---|
| १ | ५ वर्षाचे सर्व अभ्यासक्रम (उदा.बी.आर्च बी.ए.एल.एल.बी इत्यादी) | +2 | +1 | २०१८—१९ |
| २ | ४ वर्षाचे सर्व अभ्यासक्रम (उदा. बी.ई., बी. फार्म., बी.एच.एम.सी.टी. इत्यादी) | +2 | +1 | २०१९—२० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | ३ वर्षाचे सर्व अभ्यासक्रम (उदा. बीए/बीकॉम/बीएस्सी, इत्यादी) | +2 | +1 | २०२०—२१ |
| ४ | २ वर्षाचे सर्व अभ्यासक्रम (उदा. एमए/एमकॉम/एमएस्सी/एमबीए इत्यादी) | +2 | +1 | २०२१—२२ |
| ५ | १ वर्षाचे सर्व अभ्यासक्रम (उदा. डिप्लोमा) | +2 | +1 | २०२२—२३ |

याबाबत प्राप्त आदेशानुसार आपणांस कळविण्यांत येते की, ही विशेष संधी सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी. तसेच अशा विद्यार्थ्यांना भविष्यकाळात पुन:श्च संधी दिली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी व कोणताही विद्यार्थी उपलब्ध करून देण्यात आलेल्या दोन परीक्षा संधीपासून वंचित राहणार नाही, याची कृपया दक्षता घेऊन उचित कार्यवाही करावी, ही विनंती.

कळावे,

(प्रा. डॉ. प्रभाकर देसाई)
प्रभारी संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ